**<u>दिवाणी चौकशी अर्ज क्रमांक १५०८/२०२२ मधील नि. ०१ वरील आदेश.</u>**

**CNR No. MHRG 04 003682-2022**

सुखविंदर कौर दालजीत सिंग रांधवा व इतर. .. अर्जदार.

विरुध्द्

कोणी नाही. .. सामनेवाले

प्रस्तुत अर्ज मुंबई रेग्युलेशन अॅक्ट VIII ऑफ १८२७ अन्वये वारस दाखला मिळणेकरीता केला आहे.

०२. अर्जातील कथन असे की, मयत बलवंत सिंग सुरता सिंग रांधवा हे अर्जदार क्र. ०१ चे सासरे व अर्जदार क्र. २ व ३ यांचे आजोबा असून ते दि. ११/०९/२०१८ रोजी मयत झाले आहेत. तसेच मयत बलवंत सिंग सुरता सिंग रांधवा यांची पत्नी गुरमीत कौर बलवंत सिंग रांधवा हया मयत आहेत. मयत बलवंत सिंग सुरता सिंग रांधवा यांची आई जोगिंदर कौर सुरता सिंग रांधवा हया सन १९८३ साली मयत झाल्या असून त्यांचा मृत्यूचा दाखला उपलब्ध्द् नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच मयत दलजित सिंग बलवंत सिंग रांधवा हे दि. ८/४/२०१८ रोजी मयत झाले आहेत. मयत बलवंत सिंग सुरता सिंग रांधवा यांच्या नावे अर्ज कलम ११ मध्ये नमुद केलेली मिळकती बाबत वारस दाखला मिळण्यासाठी सदरचा अर्ज अर्जदारांनी दाखल केला आहे. अर्जदार यांचे व्यतिरीक्त, मयत बलवंत सिंग सुरता सिंग रांधवा यांना इतर

कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी अन्य कोणत्याही कोर्टात अशा प्रकारचा वारस दाखला मिळण्याकरीता अर्ज केलेला नाही.

०३. जाहीरनामा (नि.०७) प्रमाणे दि. ०१/११/२०२२ तसेच वृत्तपत्र "कोकण सकाळ" मध्ये दि. १९/१०/२०२२ रोजी जाहीर नोटीस (नि.१५ ) दिल्यानंतर ३० दिवसांत कोणीही सदरच्या अर्जास हरकत घेतलेली नाही.

०४. वरील कथनास पुष्ठी देण्याकरीता अर्जदार क्र. ०१ यांनी त्यांचे पूराव्याचे प्रतिज्ञापत्र (नि.११ ) वर दाखल केले आहे. मयत बलवंत सिंग सुरता सिंग रांधवा यांच्या मृत्यूच्या दाखल्याची मुळ प्रत (नि.१२), मयत दलजित सिंग बलवंत सिंग रांधवा यांच्या मृत्यूच्या दाखल्याची सत्यप्रत (नि.१३), मयत बलवंत सिंग सुरता सिंग रांधवा यांची आई जोगिंदर कौर सुरता सिं रांधवा हया सन १९८३ साली मयत झाल्या असून त्यांचा मृत्यूचा दाखला उपलब्ध्द् नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (नि.२०), मिळकत एफ–३/१:१, पहिला मजला, ईमारत नं. एफ–३, सेक्टर ४ई/बी, प्लॉट नं. ४ई/बी–९, कळंबोली, तालुका पनवेल, जिल्हा रायगडच्या खरेदीखताची सत्यप्रत (नि.१४), अर्जदार यांचे आधारकार्ड व पॅनकार्डच्या सत्यप्रती (नि.१६ ते १९) या प्रमाणे अर्जदारांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अर्जदारांनी पूरावा बंदची पुरशिस (नि.२१) वर दाखल केली आहे.

०५.        वरील सर्व बाबींचे विवेचन केल्यानंतर असे स्पष्ट होते की, अर्जदार  हे मयत बलवंत सिंग सुरता सिंग रांधवा यांचे एकमेव वारस असून सदर अर्जास इतर कुणीही हरकत घेतलेली नाही. अर्जदारांचा पूरावा हा विनाआव्हानात्मक असून त्यावर अविश्वास ठेवण्याचे कोणतेही कारण नाही. करिता, अर्ज मंजूर होण्यास पात्र असून मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## **आदेश**

| | |
|---|---|
| ०१. | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| ०२ | अर्जदार क्र. ०१ सुखविंदर कौर दालजीत सिंग रांधवा, अर्जदार क्र. ०२ नवरुप कौर दलजित सिंग रांधवा व अर्जदार क्र. ०३ मनविर दलजित सिंग रांधवा हे मयत बलवंत सिंग सुरता सिंग रांधवा यांचे वारस म्हणून घोषीत करण्यात येते व त्यांचे नावे वारस दाखला मिळकतीच्या मुल्यांकनावर आवश्यक तो मुद्रांक शुल्क दिल्यानंतर देण्यात यावा. |

ANIL RAMKRISHNA GUNNAL

Digitally signed by ANIL RAMKRISHNA GUNNAL
Date: 2023.03.15 17:54:09 +0530

(अनिल रा. गुन्नाल)

दिनांक १५/०३/२०२३          दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पनवेल.

**प्रमाणपत्र**

प्रमाणीत करण्यात येते की, या न्यायनिर्णयाच्या पि.डी.एफ. फाईलमधील संपूर्ण मजकूर मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे बरोबर आहे. करिता प्रमाणपत्र दिले तारीख १५/०३/२०२३.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | नितिन र. देशमुख |
| न्यायालयाचे नाव | श्री अनिल रा. गुन्नाल,<br>दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)<br>पनवेल. |
| निकाल तारीख | १५/०३/२०२३ |
| पिठासीन अधिका–यांनी न्यायनिर्णयावर स्वाक्षरी केल्याची तारीख | १५/०३/२०२३ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | १८/०३/२०२३ |